# वन विभाग

## प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म. रा. नागपुर यांचे कार्यालय

तळमजला, बी विंग, वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००१.

०७१२-२५५६७०१ ,ईमेल-pccfitp@mahaforest.gov.in Website-www.mahaforest.gov.in


क्रमांक:- कक्ष-15 /ICT /CAM/F.No. 258/88 /2025 -26 दिनांक 12.05.2026.

प्रति ,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव ) ,पूर्व नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( वन्यजीव) ,पश्चिम मुंबई.
मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षक ( प्रादेशिक ) ,सर्व.

**विषय** :- ICT प्रकल्पांतर्गत विकसित आणि कार्यान्वित वन्यजीव संबंधित वानिकी प्रणाली **"महा वन्यजीव नुकसान भरपाई" मोबाईल अॅप** चा पुरेपूर वापर आणि प्रचार प्रसिद्धी बाबत.

सध्यस्थितीत मानव -वन्यजीव संघर्षाच्या घटनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने नागरीकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होत असल्याचे वर्तमानपत्र तसेच सामाजिक माध्यामामुळे निदर्शनास येत आहे. वन्यजीवांची वाढती संख्या आणि निरंतर बदलता अधिवास याशिवाय अनेक आनुषंगिक कारणे त्यामागे आहेत. वन विभाग सुद्धा या बाबत सचेत असून अशा घटनांची वेळीच दखल घेत वैद्यकीय तसेच आर्थिक मदत देवून नागरिकांच्या मदतीला तातडीने धावून येत आहे.

वन्यजीव-मानव संघर्षाच्या घटनेत वन्यप्राण्यामुळे होणा-या पिकहानी, पशुहानी तसेच मनुष्यहानी करिता शासनाने वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करून नुकसान भरपाई अदा करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासनाने दिनांक ३१.०१.२०२४ रोजी वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान या करिता नुकसान भरपाई प्रदान करणे करिता वन्यजीव नुकसान भरपाई अधिनियम-२०२३ पारीत केला असून सदर अधिनियमांनुसार ३० दिवसांचे आंत संबधित पात्र अर्जदारांना लाभ मिळणे बंधनकारक करण्यात आले आहे. असे नुकसान भरपाई प्रकरणे विहित मुदतीत निकाली काढणे करिता वन विभागाने खालील 3 सेवा लोकसेवा हक्क कायदा – 2015 अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत.

१. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या पशु नुकसानीची नुकसान भरपाई मंजुर करणे
२. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती जखमी किंवा मृत झाल्यास आर्थिक सहाय्य मंजुर करणे
३. वन्यप्राण्यांच्या हानीमुळे झालेल्या पीक नुकसानीकरीता नुकसान भरपाई मंजुर करणे

सदरहू सर्व सेवा नागरिकास वन विभागाचे संकेतस्थळ (www.mahaforest.gov.in) वर Intranet Portal मध्ये "RTS" या सदराखाली ऑनलाइन उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच वरील सेवा आपले सरकार (Aaple Sarkar) पोर्टल शी (www.aaplesarkar.mahaonline.gov.in) सलग्नीत (Integrate) असल्याने लाभार्थी उक्त पोर्टल वरुन सुद्धा Access करू शकतात. सद्या प्रचलित Web Based संगणकीय प्रणाली वर अर्ज सादर करणेसाठी अर्जदारांना वनविभागाचे कार्यालय किंवा सेतु केंद्र किंवा इंटरनेट कॅफे येथे जावून आवश्यक दस्तऐवजासह माहिती भरून अर्ज करणे शक्य झाले आहे.

तथापि, घटना रात्री अप रात्री घडल्यास अर्जाची नोंदणी वन विभागाचे कार्यालयात किंवा सेतु मध्ये जावून वेळीच करणे शक्य होत नाही. अर्जदाराचा वेळ व श्रमाचा अपव्यय होत आहे आणि त्यामुळे विहित वेळेत कार्यवाही होण्यास विलंब होत आहे. प्रकरणी अर्जदारांना उक्त प्रक्रिया अधिक सुकर आणि सुलभ होण्यासाठी अर्जदारास नुकसान भरपाईचा लाभविहित वेळेत मिळण्यासाठी वन विभागाने "**महा वन्य जीव भरपाई**" मोबाइल ॲप विकसित केला आहे. सदरहू ॲप चे दिनांक 21.03.2025 ला मा. मंत्री (वने) यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. उक्त मोबाईल ॲप Google Play Store "**Maha Vanya-Jeev Bharapai**" या नावाने उपलब्ध आहे.

**Mobile App. ची वैशिष्ठे**

१. उक्त मोबाईल ॲपमुळे अर्जदारांना सेतू केंद्र किंवा इंटरनेट कॅफे किंवा वन कार्यालयात न जाता घर किंवा घटनास्थळ किंवा इतर कोणत्याही स्थळावरून कोणत्याही वेळी मोबाईलद्वारे आवश्यक माहीती भरुन अर्ज सादर करणे शक्य होणार आहे.

२. अर्ज सादर केल्यानंतर वेगवेगळ्या स्तरावरील अर्जाची स्थितीबाबत जसे अर्ज स्वीकारणे, मान्यता प्रदान करणे तसेच भरपाई रक्कम खात्यात जमा होणे इत्यादी टप्प्याबाबतची माहीती सुध्दा वेळोवेळी अर्जदारांना मोबाईलवर मिळणार आहे.

३. वन्यजीवांमुळे नुकसान भरपाई प्रकरणांत उक्त मोबाईल ॲपमुळे अधिक पारदर्शकता, गतीमानता व उत्तर दायित्व येणार आहे.

प्रकरणी क्षेत्रीय स्तरावर उपरोक्त अँप चा अधिकाधिक वापर होणे करिता सामान्य जनतेस प्रोत्साहित करणे बाबत आवश्यक जाणीव जागृती निर्माण करणे अभिप्रेत आहे. त्या अनुषंगाने आपले स्तरावरून व्यापक प्रचार प्रसिद्धी बाबतची आवश्यक कार्यवाही व्हावी, ही विनंती.

12/05/2025

(आर. जी. आगाशे, मुख्य वनसांख्यिक )
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(माहिती तंत्रज्ञान व धोरण ) म .रा.**करिता**

प्रतिलिपी :- प्रधान मुख्य वन संरक्षक, सामाजिक वनीकरण, म. रा. पुणे यांना माहितीस सादर. त्यांनी उपरोक्त मोबाइल App. बाबत भरीव जनजागृती करणे करिता प्रचार व प्रसिद्धी शाखेमार्फत प्रचार – प्रसार मोहीम संपूर्ण राज्यभर राबवावी. या करिता तयार केलेला व्हिडिओ आपणाकडे पाठविण्यात येत आहे. त्याचा पुरेपूर वापर करावा, ही विनंती.

प्रतिलिपी :- प्रधान मुख्य वन संरक्षक, (वन्यजीव), म. रा. नागपूर यांना माहितीस सादर.